ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 10 | JUNE - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# स्वराज्याची प्रेरणा आणि स्फुर्ती – राजमाता जिजाऊ

**डॉ. अनिल ठाकरे**
**इतिहास विभाग प्रमुख , श्री. गाडगे महाराज महाविद्यालय मुर्तिजापुर.**

## प्रस्तावना -



'मुल जन्मानंतर पहिली गुरु आईच असते' हे नव्याने सांगण्याची गरज नाही. शिवरायांच्या प्रत्येक पैलुवर अखेर पर्यंत मातोश्री जिजाऊंची छाप होती, हे शिवरायांच्या चारित्र्यातुन स्पष्ट होते. 'श्री शिवप्रदीप' या ग्रंथाचे ग्रंथकार पटवर्धन लिहीतात, ''स्वराज्य स्थापन करायचे हा मायलेकांचाच कृत संकल्प होता''[१] स्वराज्य निर्माण करण्याची प्रेरणा जिजाऊंची होती याचा अर्थ स्वराज्यातील गरीब, दुबळे शेतकरी, स्त्री पुरुषांच्या संरक्षणाची जबाबदारीची जाणीव शिवरायांना जिजाऊने करुन दिली यात शंका नाही.

प्राचीन काळापासुन भारतात कला, साहित्य, राजकारण अशा अनेक क्षेत्रात कित्येक कर्तुत्ववान स्त्रियांनी नावलौकीक मिळविला. त्यामध्ये राजमाता जिजाऊ यांचे नांव अग्रक्रमाने व मोठया आदराने घ्यावे लागते. 'लहानपणापासुन वडिल लखुजी जाधव व पती शहाजी राजे यांच्या पत्नी असलेल्या जिजाऊंना राजकारण, त्यांची धोरणे, समाजकारण व युध्दकौशल्याचे धडे बालपणा पासुन मिळाले होते. '[२] रानडे यांनी आपल्या 'मराठी सत्तेचा उत्कर्ष' ग्रंथात शिवरायांच्या सर्व धोरणाचे श्रेय जिजाऊंनाच दिले आहे ते म्हणतात संपुर्ण आयुष्यात जिजाऊच शिवरायांची मार्गदर्शक आणि सरंक्षक देवता होती. तिची पसंती म्हणजे साऱ्या श्रमाचे बक्षिस व त्या योगाने त्यांच्यात जे धैर्य संचारुन उंचबळे ते कसल्याही विघ्नांना जुमातीत नसे. थोर पुरुषांचा थोरपणा जर आईच्या शिकवणुकीतील स्फुर्तीवर अवलंबुन असेल तर शिवाजीच्या कामगीरीत जिजाऊंचा वाटा सिंहाचा मानावा लागतो. त्याच्या बळाचे जिजाऊ हेच प्रमुख कारण होते.[३] आधुनिक इतिहासकार सेतु माधव पगडीच्या मते ''अपल्या विख्यात पुत्राच्या आयुष्यभर चाललेल्या संघर्षात जिजाबाई ही त्यास स्फुर्ती देणारी शक्ती ठरली. परंपरावर निष्ठा व माया असणाऱ्या माता – पुत्राची अशी उदाहणे इतिहासात क्वचितच सापडतात.''[४]

## जिजाऊचे शिवरायावरील संस्कार :-

जिजाबाईंनी शिवबाला लहापणा पासुन पौराणीक ग्रंथातील कथेतुन व त्यातील नायकांच्या चारित्र्यातून विशेष संस्कार दिले. बंगळुरला वयाच्या १२ वर्षापर्यंत शिवराय शहाजी व जिजाऊंच्या तालमीत युध्दकला, कुस्ती, दांडपट्टा फिरविणे, तलवार चालविणे, घोडयावर बसणे अशा प्रकारच्या विद्या व कलांमध्ये तयार झाले. उत्तमराज्य कारभार कसा करावा, शत्रुशी युध्द कसे करावे. घोडे, हत्ती यांची निवड कशी करावी. शत्रुंशी युध्द करुन त्यांच्या दुर्गम प्रेदशातुन कसे परतुन यावे इ. अशा अनेक विद्यांचा शिवरायांना परिचय करुन दिला. राजकारण, युध्दतंत्र, स्वराज्य व स्वधर्मा बद्दलचा अभिमान परधर्माबद्दल आदर, शिस्त, साहस, अन्यायाविरुध्द प्रतिकार या सर्वांचे शिक्षण शिवाजीला जिजाऊनी बालपनीच दिले. प्रशासन, न्यायनिवाडा, लोकसंघटन, माणसाची निवड इत्यादीचा वारसा शिवरायाला जिजाऊकडुनच मिळाला होता.

जिजाऊ हया निजामशहाचे बलाढय सरदार सिंदखेडचे लखुजीरावराव जाधव यांची कन्या तर प्रारंभी निजामशहाच्या व नंतर विजापुरच्या दरबारातील मातब्बर सरदार शहाजी भोसलेंची पत्नी होत्या अशा प्रकारे दोन्ही घराण्याचा वारसा शिवरायांना मिळाला होता.

### स्वराज्यावरील संकटकाळातील जिजाऊची भुमिका :

स्वराज्याच्या मूळ संकल्पिका ते संकटकाळातील स्वराज्याच्या तारणहार अशी दुहेरी भुमिका राजमाता जिजाऊ यांनी निभवली आहे. त्या केवळ मुलाला जन्म देणाऱ्या सामान्य माता नव्हत्या तर काळाने निर्माण केलेली ती एक योजना होती कि, जी जुलमी व्यवस्थेला उलथुन टाकण्यासाठी तिची निर्मीती झाली होती म्हणुनच तत्कालीन कवी जयराम पिंडये लिहतो.

‘‘जशी चंपकेशी खुले फुल्ल जाई !
भली शोभली ज्यास जाया जिजाई !
जिचे किर्तीचा चंबु जंबु व्दिपाला !
करी साऊली माऊलीशी मुलाला‘‘!

वि. का. राजवाडे या श्लोकाचे स्पष्टीकरण देतांना म्हणतात ‘जिजाऊ‘ ही शहाजी सारख्या धीर, उदार, पराक्रमी पुरुषाला चांगलीच साजण्यासारखी बायको होती. ती केवळ नवऱ्याच्या किर्तीवर नसुन स्वतःच्या धीर व गंभीर वृतीने तिची किर्ती भारतभर पसरली होती. तिच्या किर्तीच्या चंबुखाली सर्व जंबुव्दिपातील सज्जन लोक यवनांच्या जुलमाला कंटाळुन आश्रयार्थ येत असत.[५]

जेव्हा जेव्हा स्वराज्य संकटात येई तेव्हा जिजाऊ यांनी आपला अनुभव आणि कसब पणाला लावले आहे. अगदी जावळी ताब्यात घेणे असो की बारा मावळातले सगळे देशमुख आणि रयत महाराजांच्या पाठी एकमुखाने, निष्ठेने उभे करणे असो एवठेच काय जावळीच्या घनदाट प्रदेशात प्रवेश करणे म्हणजे मरणच हे कळत असणारा अफजलखान जेव्हा प्रतापगडाच्या पायथ्याला यायला तयार नव्हता तेव्हा वाईला जाऊन खानाला भेट देणे, त्याला शिवाजी महाराजांची भेट घ्यायला प्रवृत्त करणे आणि त्या लढाईत प्रतापगडावरुन संचालन करणे इथपर्यंत जिजाऊंनी भुमिका पार पाडली. सिध्दी जौहरने पन्हाळयाला घातलेल्या वेढयातुन शिवाजी राज्यांना बाहेर काढणे नेताजी पालकरांना शक्य होईना तेव्हा स्वतः राजमाता जिजाऊ चिलखत घालुन कमरेला तलवार बांधुन घोडयावर स्वार झाल्या होत्या.[६] जिजाऊंना युध्दशास्त्राची चांगलीच जाणीव होती असे जिजाऊचे चरित्रकार बाहेकर लिहीतात ते खोटे नाही, या विधानाला ‘शिवभारतात‘ (कवी परमानंद ) सुध्दा पुष्टी मिळते. एक प्रवर्तक म्हणुन जिजाऊची भुमिक सर्वात मोठी आहे. ती पुरंदरच्या तहानुसार शिवाजी महाराज आगऱ्याला जाणार होते, पण प्रसंग ओळखुन खुप कमी भुप्रदेश आणि महसुल मिर्झाराजेंना देत पुरंदरचा तह घडवुन आणला. आगऱ्याला शिवाजीच्या जीवाला काही धोका होऊ नये म्हणुन जयसिंहाला तशी शपथ घ्यायला लावली. शिवरायांच्या गैरहजेरीत जिजाऊंनी सहा महिने स्वराज्याचा कारभार म्हणजे आणिबाणीच्या स्वराज्याचे प्रशासन चोखपणे चालवुन दाखविले.

१७ ऑगस्ट १६६६ ला शिवाजी आगऱ्यातू बाहेर पडले त्याच दिवशी जिजाऊंनी स्वतः चाल करुन रांगणा किल्ला जिंकुन घेतला. स्वराज्याचा एकही गड शत्रुला मिळु दिला नाही. शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्मितीची प्रक्रिया पूर्ण केली होती जिजाऊंनी राजांकडे राज्याभिषेकाचा आग्रह धरला होता. त्यांनी रामजी दत्ता या रत्न शाळेच्या अधिकाऱ्यांकडुन रायगडावरील सिंहासनाचे काम करवुन घेतले आपल्या माता पित्याचे स्वतंत्र राज्य निर्मीतीचे स्वप्न पुर्ण व्हावे, म्हणुन ६ जुन १६७४ ला रायगडावर विधिवत राज्याभिषेक सोहळा पार पडला.

जिजाऊंनी वेळप्रसंगी प्रशासनाची दोरी स्वतःच्या हाती घेवुन न्यायप्रिय प्रशासन कसे असते हे दाखुन दिले. त्यांनी दादोजी कोंडदेवाने चुकीचे दिलेले निवाडेच फिरविले नाही तर प्रत्यक्ष शिवाजीराजांनी केलेल्या निवाडयांचा ही निर्णय बदविला.[७]

शिवाजींची जेष्ठ पत्नी राणी सईबाईच्या पोटी १४ मे १६५७ ला संभाजींचा जन्म झाला परंतु बाळतंपणाच्या आजारामुळे ५ सप्टे. १६५९ ला राजगडावर त्यांचा मृत्यु झाला. महाराजांचे महत्वाकांक्षी मन स्वराज्याच्या उभारणीत व्यस्त होते त्यांना संभाजीकडे लक्ष देणे शक्य झाले नाही. अशा वेळी जिजाऊंनी संभाजीच्या पालन पोषणाची जाबादारी योग्यरितीने पार पाडली. त्यांच्या शिक्षण व संस्काराची जबाबदारी आपल्या अंगावर घेतली शिवरायांच्या पराक्रमाच्या कहाण्या सांगुन संभाजी मधील शौर्य जागविले. संभाजींना जिजाऊ मातृस्थानी होत्या.[८]

## सारांश :-

भारतालील गुलामगीराचा अंधःकार नाहीसा करणारा आशेचा किरण म्हणुन सारा इतिहास शिवरायाकडे पाहतो शिवरायांच्या उदयाने संपुर्ण भारतात आमुलाग्र क्रांती झाली. आपल्या अवतीभवतीच्या नैसर्गीक साधनसंपत्तीच्या संरक्षणाचा नवा विचार देणारा द्रष्टापुरुष म्हणजे शिवराय आरमार, दुर्ग, किल्ले, लष्करांची उभारणी, व्यापार, उदयोग, धार्मिक व भाषिक अभिनिवेश अशा कितीतरी क्षेत्रात नव्या विचारांची दिशा शिवरायांनी दिली. सर्वांना समान संधी व समान न्याय या विचारांची प्रत्यक्ष अंमलबजावणी महाराजांनी केली.

शिवरायांच्या या विचार व कार्यामागील खरी प्रेरणा व स्फुर्ती राजमाता जिजाबाईच होती.

## संदर्भ :-

१ पटवर्धन केशव रघुनाथ – श्री शिवप्रदिप पृ. २६
२ डॉ. पवार जयसिंगराव – शिवाजी व शिवकाळ पृ. ५७
३ रानडे न्या. – मराठी सत्तेचा उत्कर्ष पृ. ३३
४ रानडे न्या. – मराठी सत्तेचा उत्कर्ष पृ. ३३
५ कानेटकर वि.ग. (संपा) – गाजलेल्या प्रस्तावना पृ. २५
६ मेंहंदळे गजानन – श्री राजा शिवछत्रपती पृ. ६०२
७ डॉ. बाहेकर एस.ए. –राष्ट्रमाता जिजाऊ पृ. प्रस्तावना
८ बेंन्द्र वा.सी. – श्री छत्रपती संभाजी महाराज